# महात्मा गांधी शाळा विजेती

**मुंबई :** सांताक्रुझमधील साने गुरूजी आर्य विद्यामंदिर तसेच नानावटी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने आयोजित केलेल्या मल्लखांब स्पर्धेत मुंबईतील विविध शाळांतील २३ संघांमधील अंदाजे २०० मुलांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा, १२, १४, १६ वर्षांखालील आणि खुला गट अशी मुलींसाठी, तर १२, १४, १८ वर्षांखालील व खुलागट मुलांसाठी आयोजित केली होती. विनायक धामणे यांनी प्रशिक्षण दिलेली, वांद्रे येथील महात्मा गांधी विद्यालयातील मुलामुलींनी यात विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेचे खास वैशिष्ट्य म्हणजे, वरिष्ठ श्रेणीत सहभागी झालेल्या ३५ खेळाडूंना त्यांनी दाखवलेल्या कौशल्यासाठी विशेष बक्षीस मिळाले. नानावटीचे यशवंत साटम यांनी स्पर्धेचे आयोजन केले होते.